


छ. शिवाजी शिक्षण मंडळ, वडूज संचलित,

दादासाहेब जोतीराम गोडसे

कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

वडूज ता. खटाव जि. सातारा



बी. ए. भाग –३

सन २०२३–२४

मराठी विभाग

"लावणी आणि पोवाडे"

** मार्गदर्शक शिक्षक**

प्रा. आवळे डी. व्ही.

(M.A.)

विद्यार्थ्याचे नांव : माने अनुजा कृष्णत

हजेरी नंबर : ३१८

PRN NO. : 2021034100

Dept. Of

Scanned with OKEN Scanner

।।नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्‌ते।।

छत्रपती शिवाजी शिक्षण मंडळाचे

दादासाहेब जोतीराम गोडसे

कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

वडूज

ता. खटाव जि. सातारा

प्रमाणपत्र



मराठी विभाग

प्रमाणपत्र

प्रमाणित करणेत येत आहे की, माने अनुजा कृष्णत बी,ए. भाग – ३ याने/हिने २०२३ – २४ या वर्षी प्रा. आवळे डी व्ही यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी प्रकल्प अंतर्गत लावणी आणि पोवाडे या विषयावर या प्रकल्पाचे काम योग्य रीतीने व यशस्वीरीत्या पुर्ण केले आहे. सदरचे प्रमाणपत्र त्यांना देणेत येत आहे.

शिक्षक परीक्षक प्राचार्य

Scanned with OKEN Scanner

लावणी हा महाराष्ट्रातील कलाप्रकार आहे लावणी कित्येकदा तमाशाचा हिस्सा म्हणूनही सादर करतात. लवण म्हणजे सुंदर. लवण या शब्दावरून लावण्यगीत वा लावणी शब्द तयार झाला आहे लावणी हा कलाप्रकार शृंगार व भक्ती या रसांचा परिपोष करण्यासाठी पूरक माध्यम समजले जाते भक्ती रसयुक्त लावणी मागे पडली .'लास्य' रसाचे दर्शन घडविणारी लावणी हा महाराष्ट्राचा अतिशय लोकप्रिय लोककला प्रकार आहे. लास्य रस म्हणजेच शृंगाराचा परिपोष असणारा रस. लावणी म्हणजे गीत, नृत्य आणि अदाकारी यांचा त्रिवेणी संगम.

लावणी ही भारताच्या महाराष्ट्र प्रांतातली लोकप्रिय संगीताची एक शैली आहे. महाराष्ट्र राज्याच्या लोकसंस्कृतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे लावणी होय. लोकशाहीर बशीर मोमीन (कवठेकर) लिखित शृंगार श्रेणीतील लावण्या या विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रातील सर्वच प्रमुख लोकनाट्य फ्फडांनी सादर करून लोकप्रियता मिळवलीलावणी ही पारंपारिक गाणे आणि नृत्य यांचे संयोजन आहे. लावणीमध्ये ढोलकी व तुणतुणे या वाद्याचा साथीने सादर केली जाते. लावणी ही ढोलकीच्या शक्तिशाली लयीसाठी प्रख्यात आहे. मराठी लोकनाट्याच्या विकासासाठी लावणीचे मोठेच योगदान आहे. महाराष्ट्र आणि दक्षिण मध्य प्रदेशात लावणी सादर करणाऱ्या स्त्रिया या नऊवारी साड्या परिधान करून लावणी म्हणतात. ही गाणी खटकेबाज ,प्रासयुक्त ,गेय असतात.तेराव्या शतकापासून महाराष्ट्रात लावणी अस्तित्वात असली तरी पेशवाईत तिला वैभव प्राप्त झाले.लावणीला अलिकडे चांगली प्रतिष्ठा मिळाली आहे.तिचे स्वरुपही बदलले आहे. भारतात विविध ठिकाणी विविध नृत्यशैली अस्तित्वात आहेत. लावणी हा नृत्यप्रकार मुख्यतः महाराष्ट्र या राज्यात बघायला मिळतो.

अभिजन वर्गात प्रसार

सुरेखा पुणेकर यांनी सुरू केलेल्या 'नटरंगी नार' या बैठकीच्या लावणी प्रयोगांनंतर खरेतर लावणीला महिला वर्गाचे आणि अभिजन वर्गाचे एक कलाप्रकार म्हणुन पुन्हा समर्थन मिळाले.पॅरिसच्या आयफ्फेल टॉवर समोर भारत महोत्सवात नृत्य समशेर माया जाधव यांनी लावणी सादर केली. त्यामुळे लावणीला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा प्राप्त झाली'सुंदरा मनामध्ये भरली' हा लावणीवर आधारित कार्यक्रम अमेरिकास्थित मराठी

Scanned with OKEN Scanner

कलावंत डॉ. मीना नेरुरकर यांनी सादर केला त्यामुळे लावणीकडे अभिजनवर्ग वळला, हे जरी खरे असले तरी गावोगावच्या जत्रांमधून, उत्सवांमधून लावणी पिढ्यान्पिढ्या गायली जात आहे. आधुनिक चित्रपटात लावणी हा कलाप्रकार मनोरंजनासाठी समाविष्ट केला गेला आहे.लावणीच्या पारंपरिक नृत्याला आधुनिक नृत्याची जोडही देण्यात आली आहे असे दिसते.

उत्पत्ती

'लावणी'च्या उत्पत्ती विषयी दोन स्वतंत्र विचारप्रवाह आहेत. लावणीचे मूळ संतांच्या विराण्या, गौळणी, बाळक्रीडेचे अभंग यात दिसते. संतांचे संस्कार घेऊन तंतांनी म्हणजे शाहिरांनी ज्या विविध रसांच्या रचना केल्या त्यांत लावणीचा समावेश होता. महाराष्टातील संतांचे संस्कार हे तंतांवर होते. बाराव्या, तेराव्या शतकात महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात जी आध्यात्मिक क्रांती झाली त्या क्रांतिपर्वात अनेक संत उदयाला आले ते भिन्न जातीपातीचे होते. पश्चिम बंगालचे चैतन्य महाप्रभू, कर्नाटकचे पुरंदरदास, संत मीराबाई, तुलसीदास, महाराष्ट्रातून संत ज्ञानेश्वरांपासून नामदेव, तुकाराम,रामदास,एकनाथ, गोरोबा, सावता, चोखा, कान्होपात्रा, नरहरी अशी अनेक संत मंडळी विविध सामाजिक स्तरातील होती. संतांचा हा कार्यकाळ थेट १७ व्या शतकापर्यंतचा मानला जातो.

त्यानंतर १९ व्या शतकापासून तंतांचा म्हणजेच शाहिरांचा उदय झाला. ज्यांत प्रभाकर, रामजोशी, सगनभाऊ, हैबती, अनंत फ्फंदी आदींचा समावेश होता. या शाहिरांनी अनेक गण, लावण्या रचल्या. त्या सर्वच लावण्या शृंगारिक होत्या, असे नव्हे तर भक्तीरसप्रधान, वीररसयुक्त, वात्सल्यरसप्रधानही होत्या. विसाव्या शतकात पठ्ठे बापूराव, कवी बशीर मोमीन (कवठेकर), भाऊ फ्फक्कड, अर्जुना वाघोलीकर, हरि वडगावकर, दगडू बाबा साळी आदी कलावंतांनी गण, गौळणी, लावण्या, कथागीते रचली. या कथागीतांचीच पुढे वगनाट्ये झाली. ज्येष्ठ लावणी कवी बशीर मोमीन (कवठेकर) यांनी तब्बल ५० वर्षे तमाशा सृष्टीला आपल्या लेखणीतून विविध प्रकारचे मनोरंजनात्मक साहित्य पुरवले. ४००० हून अधिक लावण्या, गण, गवळण, पोवाडे आणि लोकगीतांच्या लेखनातून त्यांनी भरीव असे योगदान दिले आहे. महाराष्ट्र शासनाने बशीर मोमीन कवठेकर यांना सन २०१८ च्या 'तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्काराने' सन्मानित केले आहे.

Scanned with OKEN Scanner

'भृंगावर्ती गेय रचना' म्हणजे लावणी. 'लावणी' म्हणजे चौकाचौकांचे पदबंध लावत जाणे. कृषिप्रधान संस्कृतीत श्रमपरिहारासाठी जी गीते गायली जातात त्यांची जातकुळी लावणीसारखीच असते. लावणी शब्दाचे साधर्म्य कृषी संस्कृतीतील पेरणी, लावणीशी देखील जोडली जातेसंत साहित्यानंतरचा काळ हा लावणीचा उदयकाळ मानला जातो.

शृंगारिक लावणीचे एक उदाहरण म्हणून, लावणी कवी बशीर मोमीन (कवठेकर) यांची, १९९० च्या दशकातील, सुरेखा पुणेकर यांनी गायलेली एक लोकप्रिय लावणी खाली उद्धृत केली आहे.

शृंगार करूनी सेज सजविली रंग महाली चला

सजना पुढ्यात घ्याना मला

हि ज्वानी माझी ऐन भराला आली

शरीराचा बदलला रंग, गालावर लाली

मदनाची ही कळी उमलली निसर्गाची त्या कला सजना.....

लावणीचे प्रकार

लावणी कलाकार सीमा पोटे

लावणीचे मुख्यत: तीन प्रकार आहेत.

नृत्यप्रधान लावणी

गानप्रधान लावणी (बैठकीची लावणी)

अदाकारीप्रधान लावणी

प्रारंभकाळात लावणी गेय स्वरूपात ज्ञात होती. नृत्यप्रधान लावणी हे अगदी अलीकडच्या काळातील रूप होय. जुन्नरी, हौद्याची, बालेघाटी, छकुड, पंढरपुरीबाजाची अशी लावणीची विविध रूपे होत. जुन्नरी आणि हौद्याची लावणी प्रामुख्याने ढोलकी फ्फडाच्या तमाशात सादर होते. बालेघाटी लावणी ही रागदारी थाटाची विलंबित लयीतील लावणी होय. संगीत नाटक अकादमी पुरस्कार विजेत्या

Scanned with OKEN Scanner

सत्यभामाबाई पंढरपूरकर यांनी पंढरपुरी बाजाच्या लावणीला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. 'छक्कड' म्हणजे द्रुतलयीतील, उडत्या चालीची लावणी. यमुनाबाई वाईकर यांनादेखील लावणीतील विशेष योगदानाबद्दल संगीत नाटक अकादमी पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्यांनी बालेघाटी लावणीला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.लावणी सम्राज्ञी म्हणून ओळखल्या जाणा-या सुलोचना चव्हाण याना आपल्या सांगीतिक योगदानासाठी पद्मश्री पुर्स्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

कांताबाई सातारकर यांनी तमाशा सादरीकरण करताना छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांच्या भूमिकाही रंगमंचावर सादर केल्या आहेत.

भक्तिप्रधान लावणी

लावणी ही जसा शृंगार रसाचा परिपोष करते तसेच ती भक्तीरस ही दाखविते. चला जेजुरीला जाऊ या सारखी लावणी ही भक्तीरस प्रधान आहे

लावणी नं. १

रेशमाच्या रेघांनी लालकाळ्या धाग्यांनी कर्नाटकी कशिदा

मी काढिला हात नका लावू माझ्या साडीला !

नवी कोरी साडी लाखमोलाची भरली मी

नक्षी फूलवेलाची गुंफियले राघूमोर, राघूमोर जोडीला

हात नका लावू माझ्या साडीला !

जात होते वाटंनं मी तोऱ्यात

अवचित आला माझ्या होऱ्यात

तुम्ही माझ्या पदराचा शेव का हो ओडिला?

हात नका लावू माझ्या साडीला !

भीड काही ठेवा आल्यागेल्याची मुरवत राखा

दहा डोळ्यांची काय म्हणू बाई बाई तुमच्या या खोडीला

Scanned with OKEN Scanner

हात नका लावू माझ्या साडीला !

रेशमाच्या रेघांनी लालकाळ्या धाग्यांनी कर्नाटकी कशिदा

मी काढिला हात नका लावू माझ्या साडीला !

नवी कोरी साडी लाखमोलाची भरली मी

नक्षी फूलवेलाची गुंफियले राघूमोर,

राघूमोर जोडीला हात नका लावू माझ्या साडीला !

जात होते वाटंनं मी तोऱ्यात अवचित आला

माझ्या होऱ्यात तुम्ही माझ्या पदराचा शेव का हो ओडिला?

हात नका लावू माझ्या साडीला !

लावणी नं. २

हलगीच्या तालावर ढोल वाजतो गा गजा नाचतो रं कसा गजा नाचतो गा

अवं सोंड फिरं गरारा अनब पोट वाजं नगारा अवं लाडं लाडं मारतो कसा

आभाळात फवारा अनब ढगाच्या गा रूपानं ह्यो पाणी पाजतो गा

अवं ठुमक ठुमक बशितो अनब ना मंदी उठितो अरं खेळाची ही नशा रं, कसं दोन्ही डोळं मिटितो अनब इंद्राचा ऐरावत ह्येला लाजतो गा

लावणी नं. ३

कानात सांग माझ्या

कानात सांग माझ्या,

मी आवडे तला का?

Scanned with OKEN Scanner

रुप तव ते फूलमाळ गुंफलेली कंठी तुझ्या पडे का?

मी ज्योत प्रीतिची ही जळते तुझ्याचसाठी होऊन तू

पतंग घे झेप भेटीसाठी सद्भाग्य हे सुखाचे नशिबी तरी असे का?

मी बासरी परि त्या ओठी तुझ्या रहावे सूरांसवे सुगंधी धुंदीत गात जावे हे स्वप्न अंतरीचे होईल पूर्ण कधी का?

लावणी नं. ३

कसं काय पाटील बरं

कसं काय पाटील बरं हाय का?

काल काय ऐकलं ते खरं हाय का?

काल म्हणं तुम्ही जत्रंला गेला,

तमाशात काळजि इसरून आला

इसरल्या ठायी गावलं का न्हाई,

आज तरी संगती आणलंय का?

काल म्हनं तुम्ही तालुक्याला गेला,

कमरंचा ऐवज हरवून आला

केली वाटमारी सांजच्यापारी,

आज काय शिल्लक हायलंय का?

काल म्हनं तुम्ही इथंतिथं गेला,

बघता वषता घोटाळा झाला

काय झालं पुढं सांगा तरी थोडं,

खाली नका वघ भाता लाजताय का?

Scanned with OKEN Scanner

लावणी नं. ४ उगवली शुक्राची चांदणी

अडवू नका मज सोडा आता, पुरं झालं ना धनी उगवली शुक्राची चांदणी !

(हिचं ऐका पाव्हणं, काय हे वागणं शोभतंयब व्हयब तुम्हाला?

हिचा हात धरून, गालामध्ये हसणं शोभतंयब का तुम्हाला?

जरा लाज धरा हो येता-जाता पाहिलब ना हो कुणी !

उगवली शुक्राची चांदणी !

निरव शांतता अवतीभवती,

रातकिडं हे किरकिर करती भिरभिर उडती

वर पाकोळ्या धडधड होते मनी उगवली शुक्राची चांदणी !लवलव करिती हिरवी पाती, चमचमणाऱ्या चांदणराती वाऱ्यावरती गंध दरवळे केतकीच्या या वनी उगवली शुक्राची चांदणी !

अवो भरल्या बाजारी धनी मला तुम्ही हेरलं हेरलं ते हेरलं

अनब लगीन आपलं ठरलं लगीन झालं,

गोंधळ झाला आता एक काम हो उरलं

लोणावळा खंडाळा कोल्हापूरचा पन्हाळा

बेंगलोर गोवा नि काश्मिरला कुठं कुठं जायाचं हनिमूनला?

रातभर एकली जागू कशी? सासूला अडचण सांगू कशी? घरात पाव्हणं नब दारात मेव्हणं एकान्त मिळेना भेटायला कुठं कुठं जायाचं हनिमूनला ?

नऊवारी नेसून कारभारी खेटून बसेन शेजारी गरम अंथरूण,

गरम पांघरूण गरमागरम ह्यो मामूला कुठं कुठं जायाचं हनिमूनला ?

गुलाबी थंडीत गमतीनं मजेत राहू या संगतीनं जातानं दोषं न

येताना तिघं नातच आणूया दावायला कुठं कुठं जायाचं हनिमूनला?

Scanned with OKEN Scanner

अवतीभवती डोंगर झाडी, मधी माझी ग सासुरवाडी दोन मजली रंगीत माडी,

दारी बांधली बैलांची जोडी

हिचा भरतार तालेवार तालुक्याचा सावकार गोड बोल्या गंगाराम,

गडी गावात रुर्वबदारदोन डोंगरामधली वाट,

वर चढाया अवघड घाट घोडं घेऊन मुराळी आला,

मी निघाले नांदायाला नवी कोरी नेसून साडी

घोडं चालतंय दिडकी चाल,

झोकं घेतात कानात डुल माझ्या गळ्यात वजरटिका ग,

नाकी नथीनं धरलाय ठेका घातली हौसेनं सोन्याची बुगडी

सख्या संगती एकान्तात,

प्रीत फुलंल अंधारात हुईल काळजात गोड गुदगुली,

लाल होतील गाल मखमली मिळंल मिठीत मधाची गोडी

लावणी क्र. ५

इचार काय हाय तुमचा

इचार काय हाय तुमचा हो पाव्हणं इचार काय हाय तुमचा?

डोळं रोखून असं काय बघता हो पाव्हणं इचार काय हाय तुमचा?

नाही ओळख नाही नातं कधी झाली नाही

भेट एकटीला पाहून रस्त्यात गाठून येड्यावानी चाळा करता

रोज येऊन मागं मागं मन केलं तुम्ही माझं जागं भुलवून अशी पाडलंत फशी दुरुन हाका काय मारता?

जर असंल माझ्यावर माया नका येळ घालवू वाया रातच्यापारी आज माझ्या घरी

Scanned with OKEN Scanner

पोवाडा

पोवाडा हा अस्सल मराठी वाययप्रकार असून तो तेराव्या शतकात उदयाला आला आणि सतराव्या शतकापर्यंत जोमात राहिला. 'पोवाडा' हा दृश्य, श्राव्य प्रकार आहे. पोवाड्याचा उल्लेख 'कीर्ती' काव्यात केला जातो. पोवाडा म्हणजे 'वीरांच्या पराक्रमांचे, विद्वानांच्या मते बुद्धिमत्तेचे तसेच एखाद्याच्या सामर्थ्य, गुण, कौशल्ये इ. गुणांचे काव्यात्मक वर्णन प्रशस्ती किंवा स्तुतीस्तोत्र म्हणजे पोवाडा', तरी सुद्धा पोवाडा म्हणजे ठासून स्तुती करणे किंवा वीरांच्या पराक्रमाचे स्तुतीपर गेय कवन असे म्हणत.

पोवाड्याची उत्पती

पोवाडयाच्या सर्वांत जुना उल्लेख महिकावतिच्या बखरीत सापडतो. यासंदर्भात वि. का. राजवाडे लिहितात. बिंबराजाचा पुत्र केशव देव – याने मोठ्या ऐश्वर्याने बारावर्षे राज्य केले. त्याने राजपितामह म्हणजे आसपासच्या सर्व लहानसहान संस्थानिकांना आजा ही पदवी धारण केली. व त्या अर्थाचे बडेजावीचे गद्य पद्य पोवाडे रचिले म्हणजेच सर्वसाधारणपणे शके अकराशेच्या सुमारास मराठी भाषेत पोवाडयाची व्युत्पत्ती झाली असावी असे दिसते. वि. का. राजवाडे यांनी पोवाडयाची परंपरा चंपू काव्याशी निगडीत असल्याचे मत संपा दित बखरीच्या विवेचनामध्ये व्यक्त केले आहे. तसेच सुरुवातीचे हे पोवाडे गद्य आणि पद्य अशा दोन्ही स्वरुपाचे दिसतात.र्रें 'पोवाडा' या शब्दाच्या उत्पत्ती संबंधीचा आणखी एक उल्लेख बाराव्या, तेराव्या शतकाच्या सुमारास ज्ञानेश्वरीमध्ये सुद्धा पहावयास मिळतो. ज्ञानेश्वरीच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या अध्यायामध्ये अनुक्रमे दहाव्या आणि एकशे त्रेसष्टाव्या ओवीमध्ये 'पवाडा' असा शब्द आढळतो. याठिकाणी पवाडा याच अर्थ काही ठिकाणी स्तुती तर काही ठिकाणी युद्ध, झगडा असा घेतलेला दिसतो. यादवांच्या दरबारी यादवराजांची स्तुती गाण्यासाठी भाट होते. या भाटांचा गायनपरंपरेचा परिणाम शिवशाहीतील शाहि रांच्यावर झाला असावा. आणि या भाटांच्या संपकानेच अज्ञानदासा सारख्या शाहिराने आपल्यामध्ये असणा–या सुप्त काव्यशक्तीला मुक्त करून पोवाडयाची परंपरा शिवशाहीमध्ये रुजू केली असावी. अज्ञानदास ' सारख्या काही कवींनी गुरुस्तुती सारख्या विषया . वर क्वचीत पोवाडयाची रचना केलेली दिसते. म्हणजेच इसवी सन १६५९ च्या पूर्वीच काहीप्रमाणात का असेना पोवाडा लोकप्रिय झालेला दिसतो. सध्या उपलब्ध असलेल्या सर्व पोवाडयापैकी सर्वात जुना आणि पहिला पोवाडा

Scanned with OKEN Scanner

'अज्ञानदास यांनी लिहिलेला आहेया पोवाडयाची सुरुवात आपल्या त्याचा विषय शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा आहे गुरुला नारायण' या नावाने नमन करून केलेली आहेहा पोवाडा केवळ नाममात्र पद्य आहे अन्यथा याची उद. रचना एकतारी तुणतुण्यावर सहज सुराने गाता येईल अशी गद्याचीच आहे

'डावे हाती बिचवा ल्याला । वाघनख सरजाच्या पंजाला ॥ वरून बारीक झगा ल्याला

। कंबररस्ता वेढा केला । पोलाद घातला गळां ॥ फक्कीरंग पट्टा जिऊ म्हाल्याप दिला

। शिवाजी सरजा बंद सोडुनि चालला ॥'

या नंतरचा दुसरा पोवाडा तुलसीदास यानी शिवकालातील १२ अनेक राजकीय घटनांवर आधारित रचलेला दिसतो. त्याने आपण स्वतः शाहीर आहोत. असे स्पष्ट सांगितलेले आहे. त्यानंतर यमाजी ' हा सुद्धा नारायणाचे स्मरण करणारा असून ' बाजी पासलकर यांच्या जीवनावर पोवाडा रचलेला दिसतो. वरती निर्देश केलेले सर्व पोवाडे हे सर्वसाधारणपणे मराठेशाहीच्या पूर्वार्धातील आहेत. उत्तरार्धातील पोवाडयांच्यामध्ये 'खड्र्याची लढाई' वरील पोवाडा हसन याने रचलेला दिसतो. याच विषयावरचे तत्कालीन काळातील आणखी बरेच पोवाडे कवी राणू गुदाजी कवी बाळा लक्ष्मण' कवी भुजंग आप्पा अशा अनेक शाहिरांनी खड्र्याची लढाईचे वर्णन केलेले दिसते.

आधुनिक पोवाडे

विसाव्या शतकात शिवाजी महाराजां सोबतच, स्वांतत्र्य चळवळीतील प्रमुख लोकनेते आणि तदनंतर सामाजिक चळवळी मध्ये अग्रेसर असणारे समाजसेवक यांचा कार्यगौरव करण्यासाठी अनेक पोवाडे लिहीले गेले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, लोकशाहीर बशीर मोमीन (कवठेकर) यांनी स्वराज्य संस्थापक शिवाजी महाराज, आझाद हिंद सेनेचे सुभाषचंद्र बोस, संविधानकार डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि रयतेच्या शिक्षणासाठी झटणारे कर्मवीर भाऊराव पाटील, यांच्या जीवनावर अनेक पोवाडे लिहीले आहेत.लोकशाहीर बशीर मोमीन (कवठेकर) यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर लिहिलेला एक लोकप्रिय पोवाडा खाली उद्धृतं केला आहे.

भिमरायाने मोलाचा संदेश दिला आम्ही ही स्वीकारली पंचशीला श्रश्र

Scanned with OKEN Scanner

त्या भिमाच्या रूपाने एक सूर्य उगविला जीवनातला अंधार पार निघूनच गेला श्रश्रध्रुश्रश्र

दलितांना नव्हते पाणी, दलितांना नव्हती वाणी श्र माणूस एक असोनी जवळी ना घेती कोणी परी ह्या भीमाने एक चमत्कारच केला

पोवाडे

शिवजन्म पोवाडा

शिवनेरी किल्ला प्रख्यात । पुणे प्रांतात। अशा किल्ल्यात । हिंदवीराज्य संस्थापक खास । छत्रपति शिवाजी आला जन्मास। ऐका शाहीर गातो कवनास ॥

जसा प्रभू रामचंद्र व कृष्ण अवतार झाला, तसा महारष्ट्रात शहाजीराजे व जिजाईचे पोटी शिवअवतार होणार, असे दिल्लीपती बादशहाला कळताच–

अवताराचे मूळ मुळातून नष्ट होण्याला । गर्भवती जिजाबाईला कैद करण्याला। फ्फर्माविले लखोजी जाधव, तिच्या बापाला ॥

पोटचा गोळा भोसल्याच्या कुळात देऊन, भोसल्याशी वैर मांडणारा लखोजी जाधव,

बादशहाचे वचन मानून । जहागिरीची आस धरून। मुलीवर गेला चालून, नाते विसरून ॥

ही बातमी लागता शहाजीला। संगे घेऊन जिजाबाईला। गाठला शिवनेरी किल्ला। योग्य स्थळ आहे प्रसूतीला । म्हणून ठेवले जिजाबाईला। पण तिचं सोडून जाण्याला। छाती होईना शहाजी राजाला। कारण, जाधवराव पाठी लागलेला । त्यात प्रसुतीकालही आला। मुलुखगिरीवर तर जाणे भाग शहाजीना

जिजाबाई सती पतिव्रता । नवर ^{2}याची पाहुनी चिंता । बोलली स्पष्ट त्या वक्ता । तुम्ही तुमच्या मुलुखगिरीवर जावावे आता ॥

आणि काय? शहाजी राजे गेलेले पाहून जाधवरावांची स्वारी शिवनेरीवर येताच चवताळलेल्या वाघिणीप्रमाणे जिजाबाई बापाच्या अंगावर जाऊन म्हणाली, 'पहात्ता काय? पकडा, स्वतःच्या मुलीला परकियांच्या ताब्यात देऊन लाचार वृत्तीने तुकडे

Scanned with OKEN Scanner

चघळणारे तुम्ही माझे बाप नसून वैरी आहात वैरी. मी तुमच्या समोर तुमची मुलगी म्हणून नव्हे तर शहाजीराजाची पत्नी म्हणून उभी आहे, पकडा.'

मुलगी नव्हे देवी साकार। असा होऊन साक्षात्कार । जाधवराव जहाला गार। हातातील गळली तलवार। प्रेमाचा फ्फुटला पाझर, दाटला ऊरः ॥

जिजाबाईला जाधवरावांनी मायेने पोटाशी धरून, बाळंतपणाकरता माहेरी येण्याची विनवणी केली पण,

राजानी आणिले इयवर। शिवनेरीवर। हेच माहेर । शिवाई देवी माझी माता। पोटी झाला पुत्र शककर्ता। शाहीर पिराजी नमितो माथा ॥

गीत शाहीर पिराजीराव सरनाईक

संगीत शाहीर पिराजीराव सरनाईक

स्वर शाहीर पिराजीराव सरनाईक

गीत प्रकार प्रभो शिवाजीराजा, स्फूर्ती गीत

छ. राजाराम महाराजांचा पोवाडा

चौक १ ला

धन्य धन्य धन्य छत्रपती। राजाराम नृपति। पराक्रमी अति। दाविला हात औरंगजेबास। घेतला सूड तयाचा खास । राखिले छत्रपतिच्या नांवास ॥ धृ.॥ शिवाजीच्या मागें संभाजी। झाले रणगाजी। कलुशा परि पाजी। राज्य अधिकार ज्यांचे हातांत। गुंग केला। राजा त्यानें व्यसनांत। व्यसन नाही करित कुणाचा घात? ॥ संभाजी संगमेश्वरांत। गुंग व्यसनांत। विषय ख्यालांत। दंग झाले म्हणुनि औरंगजेबास। सिंहाच्या धरितां आले छाव्यास । शूर परि भीत नाहीं कवणांस ॥ बादशहा हाणे संभाजी। पिजन्यांमाजी। गवसला आजी । मोकळ करुनि देतों जिवदान। सोडुनी स्वधर्माचा अभिमान। हात जरी असाल आता मुसलमान ॥ चाल १ ली हे बोल ऐकुनी खोल हृदयांत टोचले शल्य। फ्फिरवुनी नयन गरागर बोलला संभाजी वीर। मुसलमान होतों सत्वर। दे बंटी तुझी गुलजार ॥ चाल २ री ऐकुनी खवळला बादशहा म्लेंछांया। खुपसूनी सळ्या डोळ्यांत लाल लोहाच्या। काढुनी नयन डोळ्याच्या केल्या दोन खाचा। अद्याप कर स्वीकार यवनधर्माचा। ऐकनी खवळला पुत्र शिवाजी राजाचा। प्राण

Scanned with OKEN Scanner